नि.फौ.ख. क्र. ११६/२०१५

नि. क्र. ९२

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.१**

शपथेवर सत्य निवेदन करतो की,

**नाव** **– नामदेव निवृत्ती जाधव**

**वय** – ४० वर्षे, **व्यवसाय**– मजूरी,

**राहणार** – हंगरगा, ता. उदगीर, जि. लातूर.

**अभियोग पक्षातर्फे सरतपास सहा. सरकारी विधिज्ञ श्री. के. टी. उगलमुगले यांचेमार्फत शपथेवर सुरू.**

दिनांक २६/०४/२०१४ रोजी ११.३० वाजताच्या सुमारास मी कोठे होतो, मला आठवत नाही. पोलिसांनी पंचनाम्याकरिता मला बोलाविले होते किंवा कसे, मला आठवत नाही. पोलिसांनी माझ्यासमक्ष जप्ती पंचनामा तयार केला, असे काही घडले नाही. आता मला पंचनामा दाखविला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर मला सांगता येणार नाही. त्यास **नि.क्र.९३** देण्यात येते.

**(सरकारी वकिलांनी केलेल्या विनंतीनुसार पुराव्याचा कायदा कलम १५४ अन्वये सूचक प्रश्न विचारण्याची परवानगी आणि फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १६२(१) नुसार पुराव्याच्या कायद्यातील कलम १४५ मधील पद्धतीने साक्षीदाराची विधाने खंडन करण्याची अनुमती दिली.)**

आरोपींना मी ओळखत नाही. हे म्हणणे खरे नाही की, पोलिसांनी माझ्यासमक्ष जप्ती पंचनामा तयार करून मोटार सायकल जप्त केली व त्या पंचनाम्यावर माझी सही घेतली. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीला वाचविण्यासाठी मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**सरतपास पूर्ण.**

**आरोपीतर्फे विधिज्ञांनी उलटतपास नाकारला.**

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत

Digitally signed by KRISHNADEO ANKUSH YADAV
Date: 2025.10.15 11:05:25 +0530

**( के. ए. यादव )**

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,

(न्यायालय क्र.२) उदगीर

दिनांक :– १४/१०/२०२५